**नि. दि. दा.क्र. २०२/२०१९**
**विजय पवार वि. बापू पवार**
निशाणी क्र. ३८

**वादीतर्फे साक्षीदार क्र.०२ यांची साक्ष**

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,

| | | |
|---|---|---|
| **माझे नाव** | :– | ओंकार सुब्राव शिंदे |
| **वय** | :– | ४१ वर्षे, **धंदा** :– दुरूस्त लिपीक, |
| **राहणार** | :– | दिघंची रोड, आटपाडी, ता. आटपाडी, जि. सांगली. सद्या ने.उपअधिक्षक भूमी अभिलेख कार्यालय सांगोला. |

**सरतपासणी वादीतर्फे – श्री. टी.आर.माडगुळकर, विद्यमान वकील यांच्यामार्फत**

**१.** मी ०८/०३/२०१० रोजी उपअधिक्षक भूमी अभिलेख विभाग, वाळवा येथे नोकरीस रुजू झालो. मला मोजणीचा पंधरा वर्षांचा अनुभव आहे. मला आज न्यायालयाचे साक्षी समन्स मिळालेले आहे. मी आज माझ्यासोबत मोजणीचे संपुर्ण मुळ प्रकरण सोबत आणलेले आहे.

**२.** मौजे हिवतड गावचा गट क्र.३६२ ची मोजणी होती. सदर मोजणीचा प्रकार हद्द कायम, कालावधी – अतितातडी, मो.र.नं.–२३२०, दिनांक १६/०७/२०१९ असा आहे. संबंधित अर्जदार व लगत कब्जेदार यांना आरपीएडीने आगाऊ नोटीस पाठविल्या. दिनांक १६/०७/२०१९ रोजी प्रत्यक्ष जागेवर जावून अर्जदार व लगत कब्जेदार यांनी दाखविल्याप्रमाणे सदर गट क्रमांक व सर्व्हे क्रमांकाच्या चालू वहिवाटी वर चुन्याच्या खुणा करुन मोजणी कामाची पुर्तता केली.

३. तद्नंतर अभिलेखांची खात्री करुन हद्दीकामी फेरनोटीस काढून जागेवर जावून अभिलेखानुसार गट क्र.३६२ च्या हद्दीखुणा दाखविल्या. त्यानंतर प्रकरण तयार करुन नकाशाचे अ, ब, क असे तीन प्रकार तयार करुन कार्यालयात जमा केला.

कार्यालयात प्रति जमा झाल्यानंतर त्याची तपासणी होवून संबंधित अर्जदाराला क प्रत देण्यात आली.

**४.** आता मला नकाशाची क प्रत दाखविण्यात आली त्यावर मोजणीदार म्हणून माझी सही आहे. तपासणीदार यांची सही आहे, त्यावर कार्यालयाचा शिक्का आहे. त्यातील मजकूर मी आजसोबत आणलेल्या अ प्रती मधील नकाशाप्रमाणे बरोबर आहे. सदर नकाशास **निशाणी क्र.३९** देण्यात येते.

**५.** निशाणी क्र.३९ चे अवलोकन केले असता, वहिवाट आणि अभिलेख यामध्ये तफावत दिसून येते. वहिवाट आणि अभिलेखात जी तफावत असते त्यास अतिक्रमण असे संबोधले जाते. गट क्र.३६१ चे गट क्र.३६२ मध्ये साधारण ६ गुंठयाचे अतिक्रमण दिसून येते.

**उलटतपास प्रतिवादी तर्फे विद्वान विधीज्ञ श्री.पी.जी.शिंदे यांचेमार्फत सुरु.**

**६.** माझे शिक्षण बी.बी.ए पर्यंत झालेले आहे. हे म्हणणे खरे नाही की माझा मोजणीसंबंधाचा महाराष्ट्र शासनाचा कोर्स झालेला नाही. हे म्हणणे खरे आहे की माझा मोजणीसंदर्भात कोर्स झालेला आहे असा दाखविणारा कागदोपत्री पुरावा आज सोबत आणलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की माझा असा कोणताही कोर्स झालेला नाही.

**७.** हे म्हणणे खरे आहे की मोजणीच्यावेळी पहिलयांदा सर्व्हे नंबरची हद्द निश्चित करावी लागते.

**प्रश्न –** सर्व्हे नंबरची हद्द क प्रत निशाणी क्र.३९ मध्ये नमूद केलेली नाही ?

**उत्तर –** क प्रत मध्ये संबंधित गटाची वहिवाट व अभिलेख दाखवला जातो, मोजणी आलेख अ मध्ये संबंधित प्रत्यक्ष जागेवर मोजणी केलेल्या गटाची व सर्व्हे नंबरची,

वहिवाटीची व अभिलेखाची हद्द नमूद केलेली असते.

८. हे म्हणणे खरे आहे की अ प्रत याकामी दाखल केलेली नाही. हे म्हणणे खरे आहे की सहा गुंठे अतिक्रमण केल्याबाबतची नोंद निशाणी क्र.३९ मध्ये नमूद केलेली नाही. हे म्हणणे खरे आहे की निशाणी क्र.३९ मध्ये निश्चित एका ठिकाणी सहा गुंठे क्षेत्राचे अतिक्रमण आढळून आले नाही. हे म्हणणे खरे आहे की, अतिक्रमित क्षेत्र असेलतर त्याला A, B, C, D या अक्षरांनी दर्शविले जाते. हे म्हणणे खरे आहे की एकापेक्षा जास्त अतिक्रमित क्षेत्र असेल तर त्या अतिक्रमित क्षेत्रांना वेगवेगळी अल्फाबेट्सने दर्शविले जाते. हे म्हणणे खरे नाही की निशाणी क्र.३९ मध्ये अतिक्रमण केले आहे असे नमूद केले नाही.

९. हे म्हणणे खरे आहे की सर्व्हे नंबरमध्ये बरेच गट असतात. हे म्हणणे खरे नाही की पहिल्यांदा संपुर्ण सर्व्हे नंबर मोजला जातो. हे म्हणणे खरे नाही की सर्व्हे नंबरमध्ये जेवढे गट आहेत, त्या गटांच्या हद्दी निश्चित केल्या जातात. हे म्हणणे खरे नाही की वेगवेगळया गटाच्या हद्दी निश्चित केल्यानंतरच अतिक्रमण आहे किंवा नाही हे दिसून येते. हे म्हणणे खरे नाही की सर्व्हे नंबरमध्ये एका गटाची मोजणी केलीतर त्याच्या हद्दी दाखविल्या जात नाहीत.

१०. गट क्र. ३६२ चा सर्व्हे क्र.७१ चा हिस्सा नं.६ असा आहे. सर्व्हे क्र.७१ मध्ये एकूण ०८ हिस्से आहेत. हे म्हणणे खरे आहे की सर्व्हे क्र.७१ मधील ०८ हिश्यांच्या हद्दी मी निश्चित केलेल्या नाहीत. हे म्हणणे खरे आहे की मोजणीकरताना जमिनीच्या बांधावरील झाडे, रस्ता, ओघळ, कॅनॉल असेल तर त्याबाबी नकाशामध्ये नमूद कराव्या लागतात. हे म्हणणे खरे आहे की मोजणी समयी बांधावर मोठी–मोठी झाडे

**नि. दि. दा.क्र. २०२/२०१९**
**विजय पवार वि. बापू पवार**
निशाणी क्र. ३८

होती, पंरतू त्याचा उल्लेख मोजणी नकाशामध्ये केलेला नाही. हे म्हणणे खरे आहे की मी मोजणीला गेलो त्यावेळेस ती मोजणी तेथील लोकांनी शांततेत पार पाडली.

**उलटतपास संपला**.

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्विकृती,

RAHUL BHALCHANDRA KULKARNI

Digitally signed by RAHUL BHALCHANDRA KULKARNI
Date: 2025.10.27 15:19:39 +0530

दिनांक –२७.१०.२०२५.

**(आर. बी. कुलकर्णी)**
सह न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
आटपाडी.